**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, MAR-APR, 2019, VOL- 6/50*

# अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान

## विशेष संदर्भ :- गट ग्रामपंचायत आंबेघर तर्फे धरमपूर, जि. पालघर

**देवानंद शिंदे[१], Ph. D. & जानू जेठ्या पागी[२]**

[१]*प्राध्यापक व विभाग प्रमुख, कुटूंब व बालकल्याण विभाग, कर्वे समाज सेवा संस्था, १८ हिलसाईड, कर्वेनगर पुणे - ५२.*

[२]*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे*

**Abstract**

*आदिवासी भागातील पंचायत क्षेत्र विस्तार (PESA- Panchayat Extention to Scheduled Area Act.) कायद्याअंतर्गत आदिवासी भागातील ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला जमीन संपादन व पुनर्वसन करीता ग्रामसभेची मान्यता, आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरावर निर्बंध, गौण खनिजे, वन उपज, बाजार, गावांतर्गत पाणी साठयांचे नियोजन, अंमली पदार्थांची विक्री, सेवन यावर निर्बंध, सावकारांकडून होणारी पिळवणूक थांबविणे इत्यादी बाबत निर्णय घेण्याचा व योग्य पध्दतीने अंमलबजावणी करण्यासाठी दिलेल्या स्वंयशासनाच्या अधिकाराचा वापर करुन ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये येऊन आपल्या गावाच्या सर्वांगीण विकासासाठीच्या योगदानावरती विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे. सदर संशोधनामध्ये विशिष्ट संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून तथ्यावर आधारित काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत.*

***मूळ शब्द :-*** *पंचायत विस्तार क्षेत्र, आदिवासी, ग्रामसभा, स्वयंशासन, अधिकार*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :-** सदर अभ्यास अनुसूचित क्षेत्र (आदिवासी भाग) असलेल्या गट ग्रामपंचायत आंबेघर तर्फे धरमपूर जि. पालघर भागातील ग्रामपंचायतीशी संबंधित आहे. आदिवासी भाग म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर शहरापासून खूप दूर ज्या ठिकाणी पायाभूत सोयी-सुविधांचा अभाव, मागासलेला भाग वगैरे अशा या भागाचा विकास आणि एकूणच ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी पंचायत राज ही त्रिस्तरीय व्यवस्था लागू केली. या पंचायतराज व्यवस्थेमुळे विशेषत: ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत झाली. तरीही आदिवासी भागात पंचायतराज व ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे बदलाचे फारसे वातावरण निर्माण झाले नाही. आदिवासी क्षेत्र हा ग्रामीण क्षेत्राच्या मानाने खूप भिन्न आहे. या आदिवासी भागाचा विकास करण्यासाठी व आदिवासी लोकांना हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या देशातील अनुसूचित क्षेत्रातील गावांना पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ ने स्वयंशासनाचा अधिकार दिला आहे.

आदिवासी जमात पुर्वीपासून उदरनिर्वाहाकरीता पूर्णपणे जंगलावरती अवलंबून होती. ब्रिटीश राजवटीच्या काळात ब्रिटीशांनी जंगलामध्ये घुसखोरी केल्यामुळे आदिवासी लोकांवरती बंधने आली. परिणामी आदिवासी

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

भागातून विविध बंड पुकारण्यात आले. शेवटी ब्रिटीशांनी १८७४ झाली आदिवासी भाग हा इतर भागापासून वेगळा केला. त्यानंतर १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टमधील भाग ३ च्या प्रकरण क्र. ५ मध्ये EXCLUDED AREAS AND PARTIALLY EXCLUDED AREAS नमूद करण्यात आले. भारतीय संविधानाच्या भाग १०, अनुच्छेद २४४ अन्वये भारतातील आदिवासी बहुल भाग हे अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले. या अनुच्छेद बरोबर २ स्वतंत्र अनुसूची जोडण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये या अनुसूचीत क्षेत्राच्या प्रशासनाबाबत स्वतंत्र तरतूदी नमूद केल्या गेल्या आहेत.

- **अनुसूची ५** - यात आसाम व मेघालय त्रिपुरा व मिझोराम ही राज्ये वगळता येणारी राज्ये व तेथील घोषित केलेला भाग समाविष्ठ करण्यात आला व त्याप्रमाणे तेथील प्रशासकीय तरतुदी मांडल्या आहेत.
- **अनुसूची ६** - यात आसाम व मेघालय, त्रिपुरा व मिझोराम ही राज्ये व तेथील घोषित केलेला भाग समाविष्ठ करण्यात आला व त्याप्रमाणे तेथील प्रशासन कसे असावे याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ (PESA- Panchayat Extention to Scheduled Area Act.) मध्ये आदिवासींच्या जीवनामध्ये खूप मोठा बदल घडवून आणण्याची क्षमता आहे, त्यामुळे आदिवासी विकासाला जरुर चालना मिळणार आहे. केंद्र व राज्य शासनस्तरावर या हक्काच्या अंमलबजावणीसंबंधात अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत.

अनुसूचित क्षेत्रासाठी अशाप्रकारच्या विविध तरतूदी करण्यात आल्या आहेत. परंतु भारत देश स्वतंत्र होऊन साधारणतः सात दशके पूर्ण होऊनही आदिवासी समाज इतर समाजाच्यामानाने खूप मागासलेला आहे. विकासाच्या दृष्टिने अनुसूचित क्षेत्रासाठी पंचायत क्षेत्र विस्तार कायदा तयार केला गेला आणि त्याद्वारे आदिवासी क्षेत्राचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. परंतू हा कायदा लागू होऊन २२ वर्षे झाली. तरीही अनुसूचित क्षेत्राचा फारसा विकास झाल्याचे दिसून येत नाही. कारण या अनुसुचित क्षेत्रातील पारंपारिक पध्दतीने केली जाणारी शेती, पायाभूत सोयी-सुविधांचा अभाव यामध्ये रस्ते, पाणी, दळणवळणाच्या सोयीचा अभाव, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांचा अभाव अशा विविध समस्या आजही आहेत. अनुसुचित क्षेत्रातील लोकांमध्ये असलेल्या समस्या व्यासनाधिनता, कुटुंबनियोजनाचा अभाव, बालविवाह अशा विविध कारणांमुळे त्या क्षेत्राचा फारसा विकास झालेला दिसून येत नाही. या कारणांवर मात करण्यासाठी ग्रामपंचायतीची ग्रामसभा ही एक खूप मोठी ताकद आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीतील ग्रामस्थांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. हे या अभ्यासावरुन दिसून आले आहे.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**संशोधन पदधती :-**

पालघर जिल्ह्याच्या विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीमधून आंबेघर या गावातील २५ पुरुष व २५ महिला व धामणी गावातील २५ पुरुष व २५ महिला अशा एकूण १०० निवेदकांची निवड करण्यात आली होती. यासाठी संभाव्यता नमूना व स्तरीय यादृच्छिक नमूना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला. संशोधन अभ्यासाकरीता वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आला. आणि संशोधन अभ्यासाच्या तथ्य संकलनाकरीता मुलाखत अनुसूची व निरीक्षण हे प्राथमिक स्त्रोत तर प्रकाशित-आयोग व समितीचे अहवाल, शासकीय, गॅजेटियर, संशोधन संस्था, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके तसेच अप्रकाशित - शासकीय रेकॉर्ड, संशोधन अहवाल या द्वितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आला.

प्रस्तुत अभ्यासाच्या निमित्ताने संशोधकाने काही निष्कर्ष काढले आहेत. त्यातील महत्त्वपूर्ण निष्कर्ष येथे मांडण्याचा प्रयत्न केला असून काही सूचनाही केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष :-** १) ५७% निवेदक हे प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित राहतात तर ४३% निवेदक हे ग्रामसभेला कधीतरी ग्रामसभेला येतात. २) ३८% निवेदक ग्रामसभेमध्ये मुदद‍ा मांडत नाहीत. ३) ६% निवेदकांच्या म्हणण्याप्रमाणे ग्रामसभेला ग्रामस्थांमध्ये मतभेद होतात असे दिसते. तसेच ग्रामसभा ग्रामस्थांच्या वेळेप्रमाणे घेतल्या जात नाहित. ४) ८७% निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांचे उत्पादन केले जाते. ५) आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या ७५% ग्रामसभा ग्रामपंचायत कार्यालयामध्येच घेतल्या जातात. तर ग्रामपंचायतीच्या पाडयांवरती ग्रामसभा घेतल्याच जात नाहीत. ६) अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घालण्यासाठी ७२% निवेदकांना असे वाटते की, ग्रामस्थांनी एकत्रित निर्णय घेऊन दारु बंदी करायला हवी. ७) पेसा कायदा माहीती नसणाऱ्या निवेदकांची संख्या ६८% आहे. ८) वनहक्काविषयी काहीही माहीती नसणाऱ्या निवेदकांचे प्रमाण ४१% आहे. ९) ५४% ग्रामस्थांच्या मते ग्रामसभेमध्ये कल्याणकारी योजनांची व नवीन आलेल्या कायद्यांची माहिती दिली जात नाही. १०) २९% निवेदकांना ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने कोणती आहेत हे सांगता येत नाही. तर ७१% लोकांनी ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. ११) ग्रामपंचायतीमधील प्रत्येक वार्डमध्ये ग्रामसभेची बैठक होत नाही असे ५८% निवेदकांचे म्हणणे आहे. १२) ग्रामसभेला महिलांच्या प्रश्नांवर चर्चा केली जात नाही. तसेच तरुणांचे मत विचारात घेतले जात नाही. १३) निवेदकांच्या म्हणण्याप्रमाणे ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य सुविधा असून त्याचा वापर होत नाही. १४) आरोग्य सुविधेसाठी ग्रामस्थांना १०-१५ कि.मी अंतरावर जावे लागते. १५) पावसाळयात आजारांचे प्रमाण वाढते. १६) वीज मोठया प्रमाणावर खंडीत करणे आणि वीज बिल खूप जास्त येणे या अडचणी

येथील ग्रामस्थांच्या वीज सुविधेबाबत मोठया समस्या आहेत. १७) २३% लोक दुसऱ्याच्या शेतावर वेठबिगारीची कामे करुन आपला उदरनिर्वाह करतात. १८) आंबेघर तर्फे धरमपुर या ग्रामपंचायतीमध्ये ७३% कुटुंबे दारिद्रयरेषेखालील आहेत. १९) व्यावसाय करण्याचे प्रमाण फक्त १% आहे. २०) २३% लोक दुसऱ्याच्या शेतावर वेठबिगारीची कामे करुन आपला उदरनिर्वाह करतात.

**सूचना/शिफारसी :-**

**ग्रामस्थांसाठी :-** १) ग्रामस्थांनी आपली जबाबदारी म्हणून प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित राहीले पाहीजे., २) ग्रामस्थांनी ग्रामसभेला चर्चिलेल्या विषयावर चौकशी केली पाहीजे., ३) ग्रामस्थांनी एकोप्याने राहीले पाहीजे., ४) ग्रामपंचायतीमध्ये दारु बंदी घालण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत., ५) ग्रामस्थांनी कल्याणकारी योजनांची व पेसा कायदा, वनहक्क कायदा यांची माहीती करुन घेतली पाहीजे., ६) ग्रामस्थांनी नैसर्गिक संसाधनांचा वापर करुन सामुहिक स्वरुपाचा रोजगार उपलब्ध केला पाहिजे.

**ग्रामसेवक आणि लोकप्रतिनिधींसाठीः-** १) जास्तीत जास्त ग्रामस्थ ग्रामसभेला उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.लोकांच्या वेळेनुसार ग्रामसभा घेतल्या पाहीजेत. २) युवकांचे म्हणणे ग्रामसभेमध्ये ग्रामसेवक व लोकप्रतिनिधींनी एकून घेतले पाहीजे. ३) ग्रामसेवक व लोकप्रतिनिधींनी ग्रामपंचायतीच्या प्रत्येक पाडयावरती भेट दिली पाहीजे. ४) ग्रामपंचायतीला उपलब्ध झालेल्या निधींचे ग्रामसभेमध्ये वाचन केले पाहीजे व कामाचे नियोजन करताना ग्रामस्थांना बरोबर घेऊन नियोजन केले पाहीजे. ५) ग्रामसेवक यांनी शासनाकडून आलेल्या योजनांची ग्रामस्थांना दिली पाहिजे.

**शासन आणि प्रशासनासाठीः-** १) अनुसूचीत क्षेत्रातील ग्रामस्थांच्या भूमिका व जबाबदाऱ्या यांची माहिति देण्याविषयीचे प्रशिक्षण प्रशासनाने ग्रामस्थांना दिले पाहीजे. २) ज्या गावामध्ये आरोग्य उपकेंद्र आहेत अशा केंद्रावरती नर्स किंवा डॉक्टर २४ तास राहतील अशी सोय केली पाहीजे. ३) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामस्थांकडे असणाऱ्या कौशल्यावर आधारित रोजगार उपलब्ध करुन देऊन तसेच त्यासाठी बाजारपेठ सुध्दा उपलब्ध करुन दिले पाहीजे. ४) प्रत्येक गावात एका पेसा समन्वयक/ पेसा दूत कर्मचाऱ्याची नेमणूक केली पाहिजे.

**सदर संशोधनाचे आदिवासी विकासासाठी संभाव्य योगदान :-**

अनुसूचित क्षेत्रामध्ये होणारे राजकारण, होणारी गटबाजी तसेच अनुसूचित क्षेत्रातील असलेले मागासलेपण यावर उपाय शोधनू सामाजिक गतिशिलता निर्माण करण्यासाठी मध्यस्थीची आवश्यकता आहे. i) अनुसूचित क्षेत्रातील नागरिकांमध्ये/ लोकांना शैक्षणिक महत्त्व पटवून देणे. ii) अनुसूचित क्षेत्रातील सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक तसेच व्यक्तीगत मागासलेपणाची माहिती मिळवून त्याविषयी सविस्तर अहवाल तयार करणे.

त्या अहवालाच्या आधारे शासन, धोरणकर्ते तसेच विविध अशासकीय संस्था यांच्याद्वारे निश्चित अशा सुधारणा करणे गरजेचे आहे. iii) अनुसूचित जमातीच्या तरुणांमध्ये विविध कौशल्ये व पध्दतींच्या आधारे आंतरक्रियात्मक पर्यवेक्षण करावे, जेणेकरुन अनुसूचित जमातीच्या तरुणांमध्ये जाणीव निर्माण होऊन आपापल्या भागाचा विकास करण्यासाठी पुढाकार घेतील. iv) व्यक्ती सहयोगकार्य, गटकार्य तसेच सामुदायिक संघटन याद्वारे अनुसूचित जमातीच्या लोकांना कायदेशिर तसेच त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाने तयार केलेले कायदे, सोयी-सुविधा, योजनांची माहिती देणे, कार्यशाळा आयोजित करुन त्यांच्यामध्ये जनजागृती करणे. या व अशा अनेक क्षेत्रामध्ये (Areas) आदिवासी समाज, ग्रामपंचायत प्रशासन, लोकप्रतिनीधी या सर्वांना सदर अभ्यासाचा उपयोग होणार आहे.

**संदर्भ सूची :-**

*आगलावे, (डॉ.) प्रदिप. (२०००). संशोधन पध्दती. नागपूर: विद्या प्रकाशन.*

*आफळे, मुरलीधर (१९९८). आदिवासी संस्कृती: कला व कथा. औरंगाबाद: सिडको. केदार- एन ४/ सी-१९.*

*देवगांवकर, (डॉ) एस.जी (२०११). आदिवासी विकास प्रशासन. नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन १ भगवाघर कॉम्प्लेक्स.*

*गारे, (डॉ.) गोविंद (२०१३). आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ. पुणे: सुगावा प्रकाशन चित्रशाळा इमारत. पुणे ४११०३०.*

*वरकड, तू. ता (२०००). आदिवासींच्या अस्तित्वाचे प्रश्न. नागपूर: रामदास पेठ. सेल्फ रिस्पेक्ट मूव्हमेंट ऑफ इंडिजीनस ईम्प्लॉइज २०३.*

*पानमंद, द.कृ. (उप.आयुक्त) योजनांची अंमजबजावणी स्थिती आणि आदिवासी जमातींचा विकास.महाराष्ट्र राज्य. आदिवासी विकास आयुक्तालय. नाशिक.*

*महाराष्ट्र शासन. आदिवासी विकास विभाग.(२०१२-१३).माहिती पुस्तिका.*

*ग्रामविकास विभाग मंत्रालय. महाराष्ट शासन. मुंबई पंचायत क्षेत्र विस्तार कायदा.१९९६. (पेसा) प्रकाशक: पेसा कक्ष. राज्य ग्रामिण विकास संस्था. यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधीनी (यशदा). पुणे.*

*ग्रामपंचायत सदस्यांच्या पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमाची संदर्भ पुस्तिका (यशदा). ग्राम सेतू प्रकाशक: यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधीनी. यशदा राजभवन आवार. बाणेर रोड. पुणे. प्रकाशन. नोव्हेंबर.२०१४*

*महाराष्ट्र शासन. आदिवासी विकास विभा. शासन निर्णय क्र.पेसा अ-२०१५/प्र.क्र.१६६/का.१७ दि.३० सप्टेबर २०१५. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब मार्च-४. २०१४*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*